# व्यसनी वस्तूंना मिळत असलेली प्रतिष्ठा राष्ट्राच्या भवितव्याच्या दृष्टीने चिंताजनक



पुणे, दि. २३ (प्रतिनिधी) - विद्यार्थ्यांमध्ये तंबाखू, सुपारी, गुटखा, सिगारेट आदी व्यसनांचे प्रमाण वाढत आहे. याला चित्रपटांपासून वडिलधाऱ्यांच्या संस्कारांपर्यंत विविध गोष्टी कारणीभूत असून सध्या या व्यसनी वस्तूंना प्रतिष्ठा मिळत आहे. ही राष्ट्राच्या भवितव्याच्या दृष्टीने चिंताजनक बाब आहे, असे प्रतिपादन भारत सरकारच्या केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

भोई प्रतिष्ठानच्या वतीने निर्माण करण्यात आलेल्या सुपारी, गुटखा, तंबाखू व कॅन्सर या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन नवी दिल्ली येथे योजना भवनमध्ये डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अरुण अडसूळ, इंदापूर कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे, चंद्रशेखर आगाशे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. नयना निमकर आदी उपस्थित होते. भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष व कान, नाक, घसा तज्ज्ञ डॉ. मिलिंद भोई आणि ओरल सर्जनचे डॉ. अलोक लाठी यांनी या पुस्तिकेची निर्मिती केली आहे.

प्रभात
२५।१०।५.



'सुपारी, गुटखा, तंबाखू व कॅन्सर' या माहितीपुस्तिकेचे प्रकाशन नवी दिल्ली येथे योजना भवनमध्ये डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. अरुण अडसूळ, डॉ. संजय चाकणे, डॉ. नयना निमकर आदी उपस्थित होते.

# तरुण पिढीत व्यसनांची फॅशन चिंताजनक बाब - डॉ. नरेंद्र जाधव

पुणे, दि. २३ (प्रतिनिधी) - शालेय विद्यार्थी व महाविद्यालयीन तरुणांमध्ये तंबाखू, सुपारी, गुटखा, सिगारेट आदी व्यसनांचे प्रमाण वाढत आहे. सध्या या पदार्थांना प्रतिष्ठा मिळत असून, फॅशन म्हणून याकडे पाहिले जाते आहे. यासंदर्भात विद्यार्थ्यांमध्ये व महाविद्यालयीन तरुणांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रसारमाध्यमे, स्वयंसेवी संस्था यांनी व्यापक प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य व अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केले.

पुण्यातील भोई प्रतिष्ठानतर्फे प्रकाशित 'सुपारी, गुटखा, तंबाखू व कॅन्सर' या माहितीपुस्तिकेचे प्रकाशन नवी दिल्ली येथे योजना भवनमध्ये डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. अरुण अडसूळ, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, डॉ. नयना निमकर आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

भोई प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. मिलिंद भोई व प्रसिद्ध ओरल सर्जन डॉ. अलोक लाठी यांनी या पुस्तिकेची निर्मिती केली असून, यामध्ये गुटखा, तंबाखू, सिगारेट आणि विशेषतः सुपारी यामुळे होणारे तोंडाचे विविध विकारांची माहिती आणि प्रतिबंधक उपायांचा यामध्ये समावेश आहे.

गुटखा, तंबाखू, सुपारी व त्यामुळे होणारे कॅन्सर या विषयावर जनजागृती करण्यासाठी सेलिब्रेटीज, विविध क्षेत्रांतील विचारवंत यांना या मोहिमेत ब्रॅण्ड ॲम्बेसिडर म्हणून सहभागी होण्याची विनंती करण्यात येणार असल्याची माहिती या मोहिमेचे संयोजक डॉ. मिलिंद भोई व डॉ. अशोक लाठी यांनी यावेळी दिली.

सामना
२५/८/११